# जिल्हा परिषद लातूर

## समाज कल्याण विभाग

## १. विभागाची माहिती

### १.१ परिचय

समाज कल्याण विभाग हा जिल्हा परिषद लातूरच्या १४ विभागांपैकी एक महत्त्वाचा विभाग आहे. जिल्हा समाज कल्याण अधिकारी हे या विभागाचे प्रमुख आहेत. मागासवर्गीय व दिव्यांग लाभार्थ्यांसाठी कल्याणकारी योजना राबविण्याचे कार्य समाज कल्याण विभागामार्फत केले जाते. विभागाचा मुख्य हेतू म्हणजे समाजातील दुर्बल घटकांच्या शैक्षणिक, आर्थिक व सामाजिक प्रगतीसाठी विविध योजनांची प्रभावी अंमलबजावणी करणे.

### १.२ व्हिजन आणि मिशन

- मागासवर्गीय व दिव्यांग व्यक्तींच्या शैक्षणिक व सामाजिक जीवनमानाचा स्तर उंचावणे

- उपजीविका साधनांच्या माध्यमातून आर्थिक विकासाला चालना देणे

- समाजातील सर्व घटकांना समान संधी उपलब्ध करून देणे

- शासन धोरणांनुसार २०% निधी मागासवर्गीयांच्या कल्याणासाठी खर्च करणे

## २. उद्दिष्टे व कार्ये

- जिल्हा परिषद सेस फंडामार्फत मागासवर्गीय व दिव्यांग व्यक्तींसाठी विविध योजना राबविणे

- महाराष्ट्र शासनाच्या समाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागाच्या योजना अंमलात आणणे

- मागासवर्गीय व दिव्यांग व्यक्तींसाठी स्वयंपूर्णतेचा विकास साधणे

- समाज कल्याण समितीच्या माध्यमातून योजनांची अंमलबजावणी व नियंत्रण

## ३. प्रशासकीय संरचना

- जिल्हा समाज कल्याण अधिकारी

- समाज कल्याण विस्तार अधिकारी

- सहाय्यक समाज कल्याण अधिकारी

- लिपिक व इतर कर्मचारी

## ४. अधिकारी संपर्क माहिती (Who’s Who)

नाव § श्री एस. टी. नाईकवाडी

पदनाम § जिल्हा समाज कल्याण अधिकारी

ई-मेल § dswozpsj.latur@maharastra.gov.in

फोन नं § ०२३८२-२५५०९२

पत्ता § समाज कल्याण विभाग, जिल्हा परिषद लातूर मुख्य प्रशासकीय इमारत

## ५. नागरी सेवा

### ५.१ सेवा

- मागासवर्गीय व दिव्यांग व्यक्तींना आरक्षण व लाभ मिळवून देणे

- शिक्षणासाठी अनुदान व शिष्यवृत्ती योजना

- स्वरोजगार प्रशिक्षण व आर्थिक सहाय्य

- वसतिगृह व निवास योजनांची अंमलबजावणी

- विविध कर्ज व अनुदान योजना

## ६. योजना व उपक्रम

### ६.१ गृहनिर्माण सहाय्य योजना

- लाभार्थी मागासवर्गीय असावा (अनु. जाती, जमाती इ.)

- दारिद्र्य रेषेखालील किंवा वार्षिक उत्पन्न मर्यादा रु. १,००,०००/-

- लाभाची रक्कम: रु. ५०,०००/-

### ६.२ सायकल वाटप योजना

- इयत्ता ५ वी ते ९ वीच्या मागासवर्गीय विद्यार्थ्यांना

- घर ते शाळेचे अंतर किमान २ किमी

- लाभाची रक्कम: रु. ७,१९२/-

### ६.३ लघुउद्योग सहाय्य योजना (घरघंटी व शिलाई मशीन)

- विजेची जोडणी आवश्यक

- लाभाची रक्कम: रु. २१,७८०/- (घरघंटी), रु. ११,८००/- (शिलाई मशीन)

### ६.४ आंतरजातीय विवाह प्रोत्साहन योजना

- लाभाची रक्कम: रु. ५०,०००/-

- एक विवाहधारक अनुसूचित जाती/जमाती व दुसरा सवर्ण समाजाचा असावा

### ६.५ दिव्यांग व्यक्तींसाठी स्वरोजगार सहाय्य योजना

- किमान ४०% अपंगत्व प्रमाणपत्र

- लाभाची रक्कम: रु. ३०,०००/-

- बीज भांडवल योजना अंतर्गत कर्ज मर्यादा: रु. १०,००० ते १,५०,०००/-

### ६.६ व्यावसायिक संगणक प्रशिक्षण (MS-CIT)

- लाभाची रक्कम: रु. ४,५००/-

### ६.७ वसतिगृह अनुदान योजना

- मागासवर्गीय विद्यार्थ्यांसाठी वसतिगृह व निवास सुविधा

## ७. दस्तऐवज व धोरणे

- शासन निर्णय व परिपत्रके

- विविध योजनांचे अर्ज व नमुने

- वार्षिक अहवाल व बजेट माहिती

- नागरी सनद

## ८. माहितीचा अधिकार (RTI)

प्रथम अपील अधिकारी § श्री एस. टी. नाईकवाडी

जन माहिती अधिकारी § सहाय्यक समाज कल्याण अधिकारी

सहाय्यक जन माहिती अधिकारी § समाज कल्याण विस्तार अधिकारी

## ९. नागरीकांची सनद

पारदर्शक योजना अंमलबजावणी

योजनांची त्वरित व प्रभावी सेवा

समाजातील सर्व घटकांपर्यंत योजना पोहोचविणे